# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.**

☎ ०२०- २५६५६२३४ **Email : ropune.dte@gmail.com**


जा. क्र. : तंशिविकापु/विवि/ईबीसी/२०१६/ 4480 दिनांक : ०३/११/२०१६

प्रति

प्राचार्य / संचालक

या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व विना अनुदानीत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था.

विषय - शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील अर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्याची शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती बाबत

संदर्भ — १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/प्र क्र २१९/तांशि-४ दिनांक ३१/०३/२०१६.

२. मा संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक १५/अर्थसं/इबीसी/वितरण-१/२०१६-१७/१०७ दिनांक २६/०९/२०१६

३. मा संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक १५/अर्थसं/इबीसी/वितरण-२/२०१६-१७/१०९. दिनांक २८/०९/२०१६

४. मा संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक १५/अर्थसं/इबीसी निधी/२०१६-१७/१०८. दिनांक २८/०९/२०१६

उपरोक्त संदर्भाधीन क्र २ व ३ च्या आदेशान्वये या कार्यालयास आर्थिकदृष्टया मागासवर्गीय लाभार्थी विद्यार्थ्याच्या शिक्षण शुल्काच्या ५०% प्रतिपूर्तीसाठी तरतूद प्राप्त झालेली आहे. ज्या संस्थांनी त्यांना वितरीत केलेल्या शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ई एस बी सी /एन एफ आर विद्यार्थ्यांची प्रतिपूर्ती रक्कम तसेच शैक्षणिक वर्ष २०१४-१५ रेग्युलर /ई एस बी सी /एन एफ आर विद्यार्थ्यांची प्रतिपूर्ती रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र व ॲक्वीटन्स रोल या कार्यालयास सादर केलेले आहेत. अशा संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ची ई बी सी प्रतिपूर्ती रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे. वितरणाचे कार्यालयीन आदेशा कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेले आहेत.

उर्वरीत संस्थांना कळविण्यात येते की त्यांना वितरीत केलेल्या शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ई एस बी सी /एन एफ आर विद्यार्थ्यांची प्रतिपूर्ती रक्कमेचे तसेच शैक्षणिक वर्ष २०१४-१५ रेग्युलर /ई एस बी सी /एन एफ आर विद्यार्थ्यांची प्रतिपूर्ती रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र व ॲक्वीटन्स रोल या कार्यालयास दिनांक ११/११/२०१६ पर्यत सादर करावेत जेणे करुन शैक्षणिक वर्ष २०१५-१६ च्या ई बी सी प्रतिपूर्ती ची रक्कम वितरीत करता येईल. यापूर्वी दिलेल्या रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र व ॲक्वीटन्स रोल जमा न केलेल्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ च्या ई बी सी चे वितरण करण्यात येणार नाही याची संस्थांनी नोंद घ्यावी.

3/11/16

प्र. सहसंचालककरिता

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत — प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी